# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः19.08.2024** **वारःसोमवार**

---

1. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना उद्योगशील बनवायचं आहे- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन
2. सातारा जिल्ह्यातलं मान्याची वाडी ठरलं राज्यातलं पहिलं सौरग्राम
3. कोलकाता महिला अत्याचार आणि हत्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयानं घेतली स्वत:हून दखल, उद्या होणार सुनावणी
4. संरक्षण क्षेत्रातल्या उत्पादनांच्या निर्मितीसाठी रत्नागिरीत निबे कंपनीची एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक
5. मराठी विज्ञान परिषदेतर्फे दिल्या जाणाऱ्या जीवनगौरव पुरस्कारांची घोषणा आणि
6. राज्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या दुर्घटनांमध्ये आठ जणांचा मृत्यू.

**मुख्यमंत्री-सातारा**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून बहिणींना उद्योगशील बनवून लखपती करायचं आहे, यात मिळणाऱ्या मदतीचा आकडाही तीन हजारांच्या पुढे जाऊ शकतो, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल सातारा इथं सांगितलं. लाडकी बहीण योजना थांबणार नसल्याची ग्वाहीदेखील मुख्यमंत्र्यांनी दिली. सातारा इथं या योजनेच्या लाभार्थी महिलांच्या सन्मान सोहळ्यात ते काल बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यावेळी उपस्थित होत्या. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर, राखी बांधण्यासाठी हजारो बहिणींचा सागर उसळला आहे, या योजनेच्या माध्यमातून आपल्याला करोडो बहिणी मिळाल्या; त्यांचे प्रश्न समजून घेता आले, अशी भावना शिंदे यांनी व्यक्त केली. महिलांच्या माध्यमातून अर्थव्यवस्था संचलित केली, तर विकसित भारताचं स्वप्न साकार होण्यास आणखी मदत होईल, असा पंतप्रधानांचा दृष्टिकोन आहे; त्यामुळेच राज्यात महिला केंद्रित योजना सुरू केल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**राख्या- हिंगोली**

दरम्यान, लाडकी बहीण योजना सुरू करून बहिणींच्या खात्यात रक्षाबंधनाची भेट जमा केल्याबद्दल हिंगोली जिल्ह्यातील लाडक्या बहिणींकडून मुख्यमंत्र्यांना 50 हजार राख्यांची भेट पाठवण्यात आली आहे.

**सौरग्राम-सातारा**

सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी गावामध्ये महावितरणनं विजेची सर्व गरज सौरऊर्जेच्या माध्यमातून भागवली आहे. राज्यातलं पहिलं 'सौरग्राम' ठरलेल्या मान्याची वाडीचं लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल करण्यात आलं. राज्य शासनानं गेल्या अडीच वर्षांत सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून वीजक्षेत्रात मोठी कामगिरी केली असून राज्यातील 44 लाख शेतकऱ्यांना एप्रिलपासून पुढील पाच वर्ष मोफत वीज देण्यात येत आहे. तर मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना आणि मागेल त्यांना सौर कृषिपंप, या योजनेतून दिवसा वीजपुरवठा करण्यात येणार

आहे. याशिवाय केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून घरगुती वीजग्राहकांचं वीजबिल देखील शून्यवत होत आहे. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकरी आणि घरगुती वीजग्राहकांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. सातारा इथल्या नवीन शासकीय विश्रामगृहाचं उद्घाटनही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं.

**सर्वोच्च न्यायालय**

कोलकाता इथं आर जी कार वैद्यकीय महाविद्यालयात, प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर झालेल्या लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयानं स्वत:हून दखल घेतली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पारडीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर उद्या (मंगळवारी) या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. या प्रकरणाचा तपास सीबीआय करत असून सीबीआयचं पथक काल आर जी कार रुग्णालयात दाखल झालं; या पथकानं माजी प्राचार्य डॉ. संदीप घोष यांची चौकशी केली.

**निषेध मोर्चा-सिंधुदुर्ग**

कोलकाता महिला अत्याचार आणि हत्या प्रकरणाचा देशभरातून निषेध होत आहे. काल सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळमध्ये बॅरिस्टर नाथ पै शिक्षण संस्था आणि विविध डॉक्टर्स संघटनांनी पोलीस ठाण्यावर निषेध मोर्चा काढत, या प्रकरणातील गुन्हेगारांना फाशी देण्याची मागणी केली.

**करार- रत्नागिरी**

राज्याचा उद्योग विभाग आणि संरक्षण क्षेत्रात काम करणारी निबे लिमिटेड कंपनी यांच्यात काल रत्नागिरीमध्ये सामंजस्य करार झाला. संरक्षण क्षेत्रातल्या उत्पादनांच्या निर्मितीसाठी निबे कंपनी रत्नागिरीत एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून, त्यातून सुमारे एक ते दीड हजार रोजगारांची निर्मिती होणार आहे. राज्याचे उद्योगमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित होते. संरक्षण क्षेत्रातला आणखी एक नवा प्रकल्प रत्नागिरीत आणला जात असून, त्यातून 10 हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत, असं सामंत यांनी यावेळी सांगितलं. संरक्षण क्षेत्रातल्या रोजगाराच्या संधींची माहिती देणारं व्याख्यान यावेळी झालं; तसंच संरक्षणविषयक उत्पादनं, शस्त्रास्त्रं यांचं प्रदर्शनही भरवण्यात आलं होतं.

**विज्ञान पुरस्कार**

मराठी विज्ञान परिषदेतर्फे दिल्या जाणाऱ्या जीवनगौरव पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. डॉ. रघुनाथ माशेलकर पुरस्कारासाठी प्राध्यापिका रोहिणी गोडबोले आणि डॉक्टर अजय सूद यांची, तर डॉक्टर कमला सोहोनी पुरस्कारासाठी डॉक्टर माधव गाडगीळ आणि डॉक्टर महताब बामजी यांची निवड करण्यात आली आहे. नांदेड इथं 16 ते 18 नोव्हेंबर या कालावधीत भरणाऱ्या 59व्या वार्षिक अखिल भारतीय मराठी विज्ञान अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

**हेलियम दिवस-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या ऐतिहासिक विजयदुर्ग किल्ल्यावर सायबाचे ओटे या ठिकाणी काल हेलियम दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी हेलियम वायूनं भरलेले फुगे आकाशात सोडून 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान' अशा घोषणा दिल्या. विजयदुर्ग किल्ल्यामध्ये ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ सर नॉर्मन लॉकियर यांनी 18 ऑगस्ट 1868 मध्ये हेलियम वायूचा शोध लावला. त्या घटनेला काल 156 वर्ष पूर्ण झाली. त्यानिमित्तानं सिंधुरत्न कार्यकारी समिती

आणि विजयदुर्ग ग्रामपंचायतीनं संयुक्तपणे हा दिवस साजरा केला. गेली सोळा वर्ष हा हेलियम दिन साजरा करण्यात येत आहे.

**<u>वन प्रबोधिनी-चंद्रपूर</u>**

राष्ट्रीय नागरी सेवा प्रशिक्षण संस्थांच्या मानकानुसार चंद्रपूर वन प्रबोधिनीला 19 डिसेंबर 2023 ते 18 डिसेंबर 2025 या कालावधीकरता उत्कृष्ट त्रि-तारांकित अर्थात थ्री स्टार मानांकन प्राप्त झालं आहे. संस्थेच्या नागरी सेवा प्रशिक्षणातील उत्कृष्टतेची दखल घेऊन क्षमता निर्माण आयोगानं ही मान्यता प्रदान केली आहे. या मान्यता प्रक्रियेत अभ्यासक्रम आराखडा, शिक्षक विकास, डिजिटलायझेशन, सहकार्य यासारख्या आठ मुख्य निकषांवर लक्ष केंद्रित केलं जातं. यापुढे या मान्यतेचा उपयोग करून वन प्रबोधिनी; वनविभाग तसंच देशाच्या नागरी सेवेत आणखी योगदान देत राहील, असा विश्वास संचालक एम. श्रीनिवास रेड्डी यांनी व्यक्त केला आहे.

**<u>राखी पौर्णिमा</u>**

बहीण भावाच्या पवित्र नात्याचं महत्त्व अधोरेखित करणारा राखी पौर्णिमेचा सण आज राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा होत आहे. राज्यातल्या ठिकठिकाणच्या कोळीवाड्यात आज नारळी पौर्णिमेचाही उत्साह बघायला मिळणार आहे.

**<u>श्रावणी सोमवार-नाशिक</u>**

तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त आज राज्यातल्या सर्व प्रमुख शिवमंदिरांमध्ये भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठी गर्दी केली आहे. नाशिक जिल्ह्यातील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर इथं काल सुमारे एक लाख भाविक रवाना झाले. त्र्यंबकेश्वर इथं श्रावणाच्या तिसऱ्या सोमवारी ब्रम्हगिरी पर्वताला प्रदक्षिणा घालण्याची परंपरा आहे. भाविकांची गर्दी लक्षात घेता राज्य परिवहन महामंडळानं त्र्यंबकेश्वरसाठी जिल्ह्यातून 270 अतिरिक्त बसगाड्यांच नियोजन केलं आहे.

**<u>आरक्षण-नांदेड</u>**

मराठा समाजानं राज्यात सुरू केलेली आरक्षणाची लढाई ही वर्चस्ववादाची लढाई आहे, अशी टीका मागासवर्गीय आयोगाचे माजी सदस्य लक्ष्मण हाके यांनी केली आहे. नांदेड जिल्ह्यातील भोकर इथं ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्यात ते काल बोलत होते.

**<u>डॉक्टर निधन-जळगाव</u>**

जळगावमधील निष्णात हृदयरोगतज्ञ डॉक्टर सुभाष चौधरी यांचं काल अल्पशा आजारानं निधन झालं. ते 79 वर्षांचे होते. डॉक्टर चौधरी यांनी गेल्या 50 वर्षांपासून रुग्णसेवा केली. विविध सामाजिक उपक्रमातही त्यांचा सक्रीय सहभाग होता. त्यांच्या पार्थिव देहावर आज जैन हिल्स इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

**<u>पाटील निधन-नाशिक</u>**

ज्येष्ठ साहित्यिक आणि अनुष्टुभ परिवारातील ज्येष्ठ संपादक गोविंदा तुकाराम तथा गो. तु. पाटील यांचं काल रात्री नाशिकच्या खासगी रूग्णालयात निधन झालं. ते 81 वर्षांचे होते. त्यांनी विपुल लेखन केलं असून वि. वा. शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट समीक्षा' या पुस्तकांचं संपादन केलं आहे. त्यांच्या 'ओल अंतरीची' या आत्मचरित्रास राज्य शासनाचा लक्ष्मीबाई टिळक उत्कृष्ट मराठी वाङ्मय पुरस्कारही मिळाला होता. त्यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी 11 वाजता येवला इथं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**<u>नाशिक-कसारा घाट अपघात</u>**

सिन्नरहून मुंबईकडे दूध घेऊन निघालेला दुधाचा टँकर काल दुपारी कसारा घाटातील दरीत कोसळून झालेल्या भीषण अपघातात पाचजणांचा मृत्यू झाला; तर चौघे जखमी झाले आहेत. टँकर भरधाव वेगात कसारा घाट उतरत असताना चालकाचं नियंत्रण सुटलं आणि लोखंडी संरक्षक कठड्याच्या जाळ्या तोडून अंदाजे 250 फूट खोल दरीत तो कोसळला.

**<u>बुडून मृत्यू-रायगड</u>**

रायगड जिल्ह्यातल्या महाडच्या सावित्री नदीपात्रात बुडून काल तीन जणांचा मृत्यू झाला. बचाव पथकानं तिघांचेही मृतदेह बाहेर काढले आहेत. सावित्री नदी पलीकडे असलेल्या दर्ग्यात दर्शनासाठी जात असताना एकाचा पाय घसरून तो नदीपात्रात बुडू लागला, त्याला वाचवायला गेलेले दोघेही बुडून मरण पावले.

**<u>पाऊस-सांगली</u>**

सांगली जिल्ह्यात काल जोरदार पाऊस झाला. अचानक आलेल्या पावसामुळं नागरिकांची धावपळ उडाली. तसच अनेक सखल भागात पाणी साचलं. पुणे शहर आणि परिसरातही काल संध्याकाळी विजांसह मुसळधार पाऊस झाला. अनेक रस्त्यांवर पाणी साचल्यानं वाहतूकीवर परिणाम झाला.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजा आणि जोराचे वारे यांच्यासह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपल, नमस्कार